भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत

(Under Section 173 B.N.S.S.-2023)

FORM-1 A

N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुं, पहिली खबर क्र. FIR No. २९, वर्ष Year २०२४, दिनांक Date २९/९/२४

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि., कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार तारीख पासून Date from २८/९/२४, वेळ Time १३.००, तारीख पर्यंत Date to २८/९/२४, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date २०/९/२४, वेळ Time ......
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ......, तारीख Date 29/9/2024, वेळ Time 09.00

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. मुंबई महानगर पालिका मुख्यालय, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ......
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ......, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ......, गाव Village विक्रोळी, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name संदिप साळवे, (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name माणसाहेब
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३२ वर्षे, (d) राष्ट्रीयत्व Nationality ......, फोन नं. Phone No. ......
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता : Address : ......, गल्ली / सर्वे नं. Ward ......, घर / नाव नंबर House/Name No. ......, फोन /मो. नंबर Phone/M. No. ......, पॅन नं. Pan No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road ......, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka ......, जिल्हा Distt. ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   श्री महेश पुंडलिक सपकाळे, वय ५३ वर्षे, पद. प्रमुख लिपीक गृह विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई (वर्ग ३ कर्मचारी).

751 - 3

फिर्याद.

श्री. संदिप नानासाहेब साळवे वय. ३२ वर्षे. धंदा. नोकरी (कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक, एफ दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका), रा.ठि. फ्लॅट नं २०५, प्रविण हिलगिरी, बी-१ अपार्टमेंट, आयसीआयसीआय बँकेजवळ, कल्याण पुर्व यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर घेण्यात आला असून त्यावरुन गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(प्रमोद खुर्वे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

जबाब दिनांक २१/०९/२०२४

श्री. संदिप नानासाहेब साळवे, वय ३३ वर्षे, धंदा – नोकरी (कनिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहायक, एफ/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका), सध्या नेमणूक – भारतीय निवडणूक आयोग, २८–मुंबई उत्तर पुर्व लोकसभा मतदार संघ अंतर्गत, १६९ घाटकोपर (प) विधानसभा मतदार संघ येथील कार्यालयीन कर्मचारी, रा. ठि. – फ्लॅट नंबर २०५, ए विंग, हिमगिरी, बी/१ अपार्टमेंन्ट, आयसीआयसीआय बॅकेजवळ, कल्याण (पुर्व), जिल्हा ठाणे, पिन कोड नंबर ४२१३०६. मो.क्र. ८९९९८०५९९०.

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील दोन वर्षापासून माझे कुटुंबियासह राहावयास आहे. मी दिनांक १६/०३/२०१७ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये कनिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहायक या पदावर भरती झालो असून सध्या मी एफ/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका येथे कार्यरत आहे.

मी माहे फेब्रुवारी २०२४ ते जून २०२४ या कालावधीत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, २८–मुंबई उत्तर पुर्व लोकसभा मतदार संघ अंतर्गत, १६९ घाटकोपर (प) विधानसभा मतदार संघ यांचे क्र. निवडणूक/१६९ घाटकोपर (प.) जा.क्र./८७३/२०२४, दिनांक १६/०४/२०२४ या आदेशान्वये लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २८ – मुंबई उत्तर पुर्व लोकसभा अंतर्गत विधानसभा मतदार संघ क्रमांक १६९, घाटकोपर (पश्चिम) येथे एक खिडकी योजनेत निवडणूक कर्तव्याकरीता कार्यरत होतो. महाराष्ट्र शासनाकडून लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असते त्यांना निवडणूकीचे कामकाज केल्याबावत मानधन/ मोबदला म्हणून मुळ वेतनाचे एक बेसिक दिले जाते.

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मी एक खिडकी योजनेत निवडणूक कर्तव्य केले होते म्हणून मी माझे मानधन/ मोबदला बाबतची विचारणा करण्यासाठी दिनांक १९/०९/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. चे दरम्यान पहिला माळयावरील निवडणूक आयोगाचे कार्यालय, वर्षा नगर महानगर पालिका शाळा संकुल, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे विधानसभा मतदार संघ क्रमांक १६९, घाटकोपर (पश्चिम) येथील समन्वय अधिकारी श्री महेश सपकाळे यांच्याकडे गेलो असता, श्री महेश सपकाळे यांनी मला माझे मुळ वेतन विचारून माझे निवडणूकीचे मानधन/ मोबदला मिळवून देण्याकरीता रूपये ५०००/– इतक्या लाचेची मागणी केली.

मला लोकसेवक समन्वय अधिकारी श्री महेश सपकाळे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दिनांक २०/०९/२०२४ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक माधूरी माने यांनी विधानसभा मतदार संघ क्रमांक १६९, घाटकोपर (प) येथील समन्वय अधिकारी श्री महेश सपकाळे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबतचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहुन घेऊन त्यावर माझी सही घेतली. सदरवेळी पोलीस निरीक्षक प्रमोद सुर्वे हे देखरेख अधिकारी म्हणून कामकाज पाहत होते. त्यानंतर दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. माधूरी माने यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज वाचण्यास दिला. पो.नि. माधूरी माने यांनी सांगितलेली हकीकत व मी दिलेली लेखी तक्रार सारखीच असल्याचे पंचानी खात्री करून माझा तक्रार अर्ज वाचून त्यावर सहया करून पो.नि. माधूरी माने यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला.

पो.नि. माधूरी माने यांनी माझे तक्रार अर्जावर लगेच कारवाई करण्यात येईल असे मला सांगितले. पो.नि. माधूरी माने यांनी दिनांक २०/०९/२०२४ रोजी पंचांसमक्ष लोकसेवक श्री महेश सपकाळे यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि. माधूरी माने यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून माझे, पोनि माधुरी माने व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून विक्रोळी पश्चिम बेस्ट बस आगार येथील गुरूनानक स्कुल बस स्टॉपजवळ थांबलो. त्यानंतर मला पोनि प्रमोद सुर्वे व पोनि माधूरी माने यांनी पडताळणी कारवाईबाबतच्या आवश्यक त्या सुचना देवून मला विधानसभा मतदार संघ क्रमांक १६९, घाटकोपर (पश्चिम) येथील समन्वय अधिकारी लोकसेवक श्री महेश सपकाळे यांची भेट घेण्याकरीता पहिला माळयावरील निवडणूक आयोगाचे कार्यालय, वर्षा नगर महानगर पालिका शाळा संकुल, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे डिजीटल

व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. सागर पाटील यांचे सह पाठविले. त्यादरम्यान माझी लोकसेवक श्री महेश सपकाळे यांचे सोबत भेट झाली. त्यावेळी लोकसेवक श्री सपकाळे हे त्यांचे कामामध्ये व्यस्त होते. त्यामुळे त्यांनी मला थोडयावेळाने या असे सांगितले. त्यानंतर मी थोडयावेळाने लोकसेवक श्री सपकाळे यांना कधी येवू ? असे विचारले असता त्यांनी मला कॉल करून नंतर ये असे सांगितले. सदर दिवशी लोकसेवक श्री सपकाळे हे कामामध्ये व्यस्त असल्याने व त्यांनी मला कॉल करून नंतर ये असे सांगितल्याने सदर दिवशी आमच्यामध्ये लाचे संदर्भात बोलणे झाले नाही.

दिनांक २६/०९/२०२४ रोजी मी माझे वर नमुद तक्रारी संदर्भात लाप्रवि कार्यालयात हजर राहीलो असता, पोनि माधूरी माने या आजारी असल्याने कर्तव्यावर येवू शकत नसल्याने लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माझे तक्रारीबाबत पोनि प्रमोद सुर्वे यांना पुढील चौकशी करण्यास सांगितले. पोनि प्रमोद सुर्वे यांचे सुचनेप्रमाणे मी दोन पंचासमक्ष लाप्रवि कार्यालयातील गोपनिय कक्षामधून माझे मोबाईल नंबर ८९९९८०५९९० वरून लोकसेवक श्री सपकाळे यांचे मोबाईल नंबर ९९६९४३५९५९ वर संपर्क केला असता, लोकसेवक श्री सपकाळे यांनी मला प्रत्यक्ष भेटून बोलू असे सांगितले. सदरचे संभाषण हे पोनि प्रमोद सुर्वे यांनी पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत केले. सदर दिवशीच्या फोनवरील संभाषणामध्ये लोकसेवक श्री सपकाळे यांनी मला प्रत्यक्ष भेटून बोलण्याबाबत सांगितल्याने दिनांक २७/०९/२०२४ रोजी लोकसेवक यांची त्यांचे कार्यालयात जावून प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी कारवाई करण्याचे पोनि सुर्वे यांनी मला सांगितले.

दिनांक २७/०९/२०२४ रोजी मी पोनि सुर्वे यांचे सुचनेप्रमाणे लाप्रवि कार्यालयात हजर झालो. सदरदिवशी पोनि सुर्वे यांनी मला पडताळणीकरीता पंच श्री अजय फड यांचेसह पुन्हा लोकसेवक श्री सपकाळे यांचे कार्यालयात जावयाचे असल्याचे सांगितले. तसेच सदर कारवाईकरीता सहायक पोलीस आयुक्त अर्चना सुतार यांनी देखरेख अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगून त्यांचे सोबत ओळख करून दिली. त्यानंतर पोनि सुर्वे यांनी माझे, त्यांचे स्वत:चे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुदीत केले व आम्ही पडताळणी कारवाईकरीता ला.प्र. वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून विक्रोळी पश्चिम बेस्ट बस आगार येथील गुरूनानक स्कुल बस स्टॉपजवळ थांबलो. त्यानंतर मला सपोआ अर्चना सुतार व पोनि प्रमोद सुर्वे यांनी पडताळणी कारवाईबाबतच्या आवश्यक त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. अजय फड यांचे सह लोकसेवक यांचे भेटी करीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यादरम्यान माझी लोकसेवक श्री महेश सपकाळे यांचे सोबत भेट झाली. त्यावेळी लोकसेवक श्री सपकाळे हे जेवण करण्याकरीता जात असल्याने त्यांनी मला अर्ध्या एक तासाने बोलाविले. त्यावर मी व पंच श्री फड पोलीस वाहनाजवळ परत आलो असता, पोनि सुर्वे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला लावलेले व्हाईस रेकॉर्डर बंद करून स्वत:जवळ ठेवला. त्यानंतर मी पोनि सुर्वे यांना लोकसेवक हे जेवण करण्याकरीता गेले असल्याचे सांगून अर्ध्या एकातासाने भेटण्याकरीता बोलाविले असल्याचे सांगितले.

काही वेळाने पोनि सुर्वे यांनी माझे शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करून मला पंच श्री फड यांचे सोबत पुन्हा लोकसेवक यांचे भेटीकरीता पाठविले. भेटी दरम्यान लोकसेवक सपकाळे यांनी माझे सोबत आलेल्या पंच श्री अजय फड यांचेबाबत मला विचारणा केली असता, मी त्यांची ओळख माझा मित्र अशी करून दिली तेव्हा लोकसेवक यांनी मला पंच श्री फड यांना बाहेर थांबण्यास इशारा करून सांगितले. त्यावेळी मी पंच श्री फड यांना कार्यालयाच्या बाहेर थांबण्याबाबत सांगितले. त्यावेळी पंच श्री फड हे थोडया अंतरावर थांबून आमच्या हालचालीवर लक्ष देवू लागले. त्यादरम्यान मी लोकसेवक सपकाळे यांना माझे प्रलंबित बिलाबाबत चर्चा केली असता लोकसेवक सपकाळे यांनी त्यांचे हाताचे पंजाने पाच बोटे दाखवून इशारा केला. तेव्हा मी लोकसेवक यांना किती होईल असे म्हणालो असता लोकसेवक सपकाळे म्हणाले, ''पंजा नाही दिसला तुला'' तेव्हा मी म्हणालो चार दिसताय, पंजा काय आहे, बेसीक होत बत्तीस हजार तीनशे, तेव्हा सपकाळे म्हणाले, ''हो'' तेव्हा मी म्हणालो पाच हजार होतील, काही मधला मार्ग, दहा टक्के, विस टक्के असे काही... विस टक्के तर जास्त होतात. तेव्हा सपकाळे म्हणले 'वाढवून टाक', ''मी बाजार उघडलेला नाही... तुला जमत असेल तर थांब... जा... तस कन्व्हेस करून घ्याव लागणार... ते खर्च काय आम्ही खिश्यातून करायचे'' तेव्हा मी म्हणालो ते कधी देवू,

तेव्हा लोकसेवक श्री सपकाळे म्हणाले "सोबत" असे म्हणून लोकसेवक श्री सपकाळे यांनी कागदपत्रासोबत पैसे घेवून येण्यास मला सांगितले.

त्यानंतर मी व पंच श्री. फड पोलीस वाहनाजवळ आलो त्यावेळी पोनि सुर्वे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून काढून घेतला. सपोआ अर्चना सुतार व पोनि सुर्वे यांनी झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, लोकसेवक श्री महेश सपकाळे यांनी पडताळणी दरम्यान माझेकडे हाताच्या पंजाचा इशारा करून रूपये ५,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेची स्पष्टपणे मागणी करून लाचेची रक्कम, कॅन्सल चेक, निवडणूक प्रक्रीयाकरीता नियुक्ती आदेशाची प्रत व माझी वेतनाची पावती घेवून मला सोमवारच्या आत येण्यास सांगितले. त्यावर पोनि सुर्वे यांनी मला व पथकास सापळा कारवाई ही दिनांक २८/०९/२०२४ रोजी करणार असल्याचे सांगून दिनांक २८/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. लाप्रवि कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचित केले.

दिनांक २८/०९/२०२४ रोजी सकाळी १०.३० वा. मी लाप्रवि कार्यालयात पोनि सुर्वे यांचे समक्ष हजर राहीलो. त्यावेळी पोनि सुर्वे यांनी मला लोकसेवक यांना देण्यात येणाऱ्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, मी माझेकडील माझे बचतीमधील रोख रक्कम रूपये ५,०००/– (रू. ५००/– दराच्या १० भारतीय चलनी नोटा) पोनि सुर्वे यांचे ताब्यात दिली. त्यावर पोनि सुर्वे यांनी सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन पथकातील पो.ह. चालक श्री. भोसले यांनी मला व पंचाना अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर पोनि सुर्वे यांचे सुचनेप्रमाणे पंचासमक्ष रुपये ५,०००/– इतक्या लाचेच्या रक्कमेस पो.ह. चालक श्री. भोसले यांनी अँथ्रासीन पावडर लावली व लाचेची रक्कम व्यवस्थित घडी करुन माझे शर्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. सुर्वे यांनी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे हातातील काळया रंगाची सॅग बॅग माझे पाठीस अडकवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. सपोआ अर्चना सुतार व पोनि सुर्वे यांनी मला, पंचाना व पोलीस पथकास सापळा कारवाईबाबतच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि सुर्वे यांनी स्वतःचे, पंचाचे व माझे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले व आम्ही सापळा कारवाईकरीता ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून विक्रोळी पश्चिम बेस्ट बस आगार येथील गुरूनानक स्कुल बस स्टॉपजवळ थांबलो. दिनांक २७/०९/२०२४ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री सपकाळे यांनी माझे सोबत आलेल्या पंच श्री अजय फड यांना बाहेर थांबण्यास सांगितल्याने सापळा कारवाई दरम्यान मी पुन्हा पंच श्री फड यांना सोबत नेल्यास लोकसेवकास संशय येण्याची शक्यता असल्याने सापळा कारवाई दरम्यान माझे सोबत पंच श्री सागर पाटील यांना पाठविणार असल्याचे पोनि सुर्वे यांनी मला सांगितले.

पोनि सुर्वे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करून पंच श्री. सागर पाटील यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. सपकाळे यांचे पहिला माळयावरील निवडणूक आयोगाचे कार्यालय, वर्षा नगर महानगर पालिका शाळा संकुल, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे पाठविले. त्यादरम्यान सापळा पथकातील एक महिला पोलीस अंमलदार व एक पोलीस अंमलदार हे मी जाण्यापुर्वीच लोकसेवक यांचे कार्यालयात कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले होते व उर्वरीत सापळा पथक हे लोकसेवक यांचे कार्यालयाच्या आजूबाजूस कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले होते. मी, पंच श्री. सागर पाटील यांचे सोबत लोकसेवक श्री. सपकाळे यांच्या कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक कार्यालयात हजर नव्हते. मी बराच वेळ थांबून राहीलो असता लोकसेवक सपकाळे हे कार्यालयात न आल्याने मी, पंच श्री सागर पाटील यांचे सोबत पोलीस वाहनाजवळ जाण्याकरीता निघालो. माझे मागून लोकसेवक यांचे कार्यालया बाहेर थांबून राहीलेले सापळा पथक देखिल पोलीस वाहनाजवळ आले. त्यावर पोनि सुर्वे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला लावलेले व्हाईस रेकॉर्डर बंद करून तो स्वतःजवळ ठेवला. त्यानंतर मी पोनि सुर्वे यांना लोकसेवक हे कार्यालयात हजर नसल्याचे सांगितले. पोनि सुर्वे यांचे सुचनेप्रमाणे मी पंचासमक्ष माझे मोबाईल नंबर ८९९९८०५९९० वरून लोकसेवक श्री सकपाळे यांचे मोबाईल नंबर ९९६९४३५९५९ वर संपर्क केला असता,

लोकसेवक सपकाळे यांनी ते जेवण करण्याकरीता बाहेर गेले असल्याचे सांगितले. सदरचे मोबाईलवरील संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरमध्ये पोनि सुर्वे यांनी ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर काही वेळाने पोनि सुर्वे यांनी माझे शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून तो चालू करून मला पंच श्री सागर पाटील यांचे सोबत पुन्हा लोकसेवक यांचे भेटीकरीता पाठविले. माझे मागून सापळा पथक देखिल लोकसेवक यांचे कार्यालयाच्या जवळ आले व कार्यालयाच्या आजूबाजूस कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीले. मी, पंच श्री सागर पाटील यांचे सोबत लोकसेवक श्री सपकाळे यांचे कार्यालयातील कक्षामध्ये जावून त्यांची भेट घेतली असता, लोकसेवक श्री सपकाळे हे त्यांचे कामामध्ये व्यस्त होते व त्यांना तहसिलदार मॅडम बोलावत असल्याने ते वारंवार त्यांना भेटण्याकरीता ये जा करीत होते. मी, पंच श्री सागर पाटील यांचेसह लोकसेवक यांचे कक्षामध्ये बसून थांबलो. काही वेळाने लोकसेवक श्री सपकाळे हे कक्षामध्ये आले व त्यांनी माझेकडे मी घेवून आलेल्या कागदपत्रांची मागणी केली. त्यावर मी माझेकडील कागदपत्रे त्यांना दिली असता लोकसेवक यांनी मी दिलेल्या कागदपत्रांवरून त्यांचे संगणकामध्ये माझे बिल तयार करून त्याची प्रिंन्ट काढून त्यावर माझी स्वाक्षरी घेतली. त्यानंतर त्यांनी माझेकडे हाताचा इशारा करून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी माझे शर्टच्या पुढील बाजूच्या डाव्या खिशामधील रूपये ५,०००/– इतक्या लाचेची रक्कम लोकसेवक श्री सपकाळे यांचे समक्ष धरली असता लोकसेवक सपकाळ यांनी सदरची लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक यांच्या कक्षाच्या बाहेर येवून सापळा पथकास दिसेल अशारीतीने माझे हातातील काळया रंगाची सॅग बॅग माझे पाठीस अडकवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने कार्यालयात येवून लोकसेवक श्री महेश सकपाळे यांस पकडले. त्यावेळी सपोआ अर्चना सुतार व पोनि सुर्वे यांनी त्यास त्यांची ओळख सांगुन सापळा कारवाईबाबत माहीती दिली. पो.नि. सुर्वे यांनी लोकसेवक श्री सपकाळे यांना लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी लाचेची रक्कम टेबलाच्या डॉव्हरमध्ये ठेवलेली असल्याचे सांगितले. सदरची लाचेची रक्कम पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी यांनी त्यांची संबधीत कारवाई तेथेच पुर्ण करुन पुढील कार्यवाहीकरीता आम्ही सर्व लोकसेवक श्री महेश सपकाळे यांचेसहीत ॲन्टीकरप्शन ऑफिस, वरळी, मुंबई येथे आलो.

माझा लोकसेवक श्री महेश सपकाळे यांचेशी कोणताही वैयक्तिक आर्थीक देवाण – घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

तरी मला मी लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १६९ घाटकोपर (प), विधानसभा मतदार संघामध्ये एक खिडकी योजनेत केलेल्या कामाचा शासनाकडून मोबदला म्हणून एका वेतनाचे बेसिक एवढे मानधन मिळवून देण्याकरीता लोकसेवक श्री. महेश पुंडलिक सपकाळे, पद – प्रमुख लिपीक, नेमणुक – दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई सध्या नेमणूक – समन्वय अधिकारी मुंबई उत्तर पूर्व लोकसभा अंतर्गत घाटकोपर (पश्चिम) विधानसभा मतदार संघ १६९ यांनी माझेकडे दिनांक २७/०९/२०२४ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान रुपये ५,०००/– इतक्या लाचेची मागणी केली व दिनांक २८/०९/२०२४ रोजी पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन रुपये ५,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक श्री. महेश पुंडलिक सपकाळे, पद – प्रमुख लिपीक, नेमणक – महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना वरळी, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई सध्या नेमणूक – समन्वय अधिकारी मुंबई उत्तर पूर्व लोकसभा अंतर्गत घाटकोपर (पश्चिम) विधानसभा मतदार संघ १६९ यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वर नमुद जबाब पो.नि. प्रमोद सुर्वे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मला मराठीतून वाचून, समजावुन सांगितला असून तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,
(signature)
( प्रमोद सुर्वे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

S.N. Salve
(संदिप नानासाहेब साळवे)

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळ, व ठिकाणी. तक्रारदार यांना मुंबई उत्तर पुर्व लोकसभा (प
मतदार संघामध्ये एक खिडकी योजनेचे काम पहाण्या करिता आदेशित केले हो
निवडणुक काळात कामाच्या मोबदला म्हणुन शासनाकडुन कर्मचाऱ्यांना त्यांच्या
बेसिक तेवढे मानधन मिळणार होते. सदर मानधन काढण्यासाठी आलोसे महेश
पुंडलिक सपकाळे (प्रमुख लिपीक) यांनी तक्रारदार यांना ५०००/- रु लाचेची माग
केली. पंचासमक्ष सापळा कारवाई करण्यात आलोसे यांनी तक्रारदार यांच्याक
५०००/- रु लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणुन. भा.प्र.अधि. १९८८ कल
अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .......... District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name प्रमोद पुर्वे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. मुंबई
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**